# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)
# महाराष्ट्र राज्य पुणे४११००१

Web : www.dhepune.gov E-mail : budget.dhepune@nic.in

फोननं.०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्सनं. ०२०/२६१११११५३

क्र. अर्थस-२०१८-१९ ( /१९) लेखा -२ X5060 दि. २६ मार्च,२०१९

27 MAR 2019

प्रति,

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
यांच्या अधिपत्त्याखालील सर्व शासकीय महाविद्यालये/संस्था/वसतीगृहे/कार्यालये

**विषय- आहरण व संवितरण अधिका-यांच्या बँक खात्यांमध्ये असलेल्या अखर्चित रकमा शासनखाती जमा करणेबाबत**

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासनपरिपत्रक क्र.संकीर्ण २०१९/ प्र.क्र.२९/ १९/कोषा.प्रशा.५ दि.२०.३.२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय शासन परिपत्रकाचे अवलोकन करावे.

सदर परिपत्रकानुसार आहरण व संवितरण यांना विविध प्रकारच्या देयकांचे प्रदान कोषागारांमार्फत झाल्यानंतर त्यांच्या बँकेच्या खात्यांमध्ये अशा रकमा जमा करुन त्या रकमांचे वितरण करतात. सदरचे बँक खाते हे चालू खाते/बचत खाते/क्रेडीट खाते या स्वरुपाचे असते.

२.अधिकारी व कर्मचा-यांचे नियमित वेतन, अवितरीत वेतनाच्या रकमा (अधिकारी/कर्मचा-यांच्या रजांमुळे) अशासकीय वजाती जसे- जीवनविमा, पोस्ट विमा, आवर्ती खाते (RD) इ. तसेच कार्यालय सुरळीतपणे चालू ठेवण्यसासाठी करावयाच्या किरकोळ खर्चासाठी (पेट्राल/डिझेल) संक्षिप्त देयकाद्वारे उपलब्ध झालेली आणि स्थायी अग्रिमासाठीची रक्कम प्रामुख्याने आहरण व संवितरण अधिका-यांच्या चालू खात्यामध्ये प्रथमत: जमा करुन नंतर संबंधितांना वितरीत करणे अभिप्रेत आहे. या कारणांसाठी आहरण व संवितरण अधिका-यांचे कार्यालयीन चालू खाते वापरण्यात येते.

३.तथापी, ब-याच वेळेस केवळ संबंधित लेखाशिर्षातील मंजूर निधी व्यपगत होऊ नये म्हणून आवश्यकता नसतांना आर्थिक वर्षाअखेर अनेक आहरण व संवितरण अधिकारी कोषागारांतून मोठया रकमा पारीत करुन त्यांच्या अधिन कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा करतात.

४.तसेच जेथे केंद्र शासनाच्या योजना राबविण्यासाठी, मिळालेल्या अनुदानासाठी स्वतंत्र बँक खाते आहरण संवितरण अधिका-यांद्वारे उघडले जातात, त्या खात्यांतील रकमा देखील ब-याच प्रमाणात अखर्चित राहत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

५.सदर शासकीय निधी खर्च न झाल्याने विनावापर पडून असल्याची बाब वित्त विभागाने ऑन लाईन घेतलेल्या माहितीद्वारे निदर्शनास आली आहे.

उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता, आहरण व संवितरण अधिका-यांना सूचित करण्यात येते की, मागणीदार/ पुरवठादार/शासकीय कर्मचारी यांना प्रदान करावयाच्या प्रलंबित रकमा त्यांचे कडील बँक खात्यातून त्वरीत अदा कराव्यात व उर्वरीत रक्कम दि.३१ मार्च पर्यंत शासकीय लेख्यात जमा करावी.

सबब संदर्भीय शासनपरिपत्रकानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.५.४.२०१९ पर्यंत संचालनालयास सादर करण्यात यावा .

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालनालय (उ.शि)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत:-मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.